# बाळासाहेब खेर महिला प्रबोधन व्यासपीठांतर्गत महिला मेळावा उत्साहात

रत्नागिरी, (प्रतिनिधी) : स्वयंसेतून आयोजित बाळासाहेब खेर महिला प्रबोधन व्यासपीठांतर्गत पहिला महिला मेळावा बाळासाहेबांच्या शतकोत्तर रौप्यमहोत्सवी जयंती दिनी वळके ग्रामपंचायत पाली, येथे २४ ऑगस्ट रोजी सरपंच सुनिता सावंत यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आला.

स्वयंसेून गेली १३ वर्षेविविध विषयांवर महिला, तरूणपिढी (विशेषतः ग्रामीण भागातील) यांच्याकरिता प्रबोधनपर चर्चासत्रांचे आयोजन करीत आहे. आजवर अशी २२५ चर्चासत्रे आयोजित केली गेली. ज्या गावांमध्ये केवळ पारंपारिक हळदीकुंकवाशिवाय कोणताही कार्यक्रम घेतला जात नाही अशा दुर्गम भागातील गावांमध्ये स्वयंसेतूतर्फे वैचारिक प्रबोधन केले जाते. स्वयंसेतूला १ लाख रुपयांची देणगी देणाऱ्या दानशूर बाळासाहेब खेर ट्रस्टप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी हे व्यासपीठ नामांतरीत केले आहे.

यावेळी बहुसंख्य महिलांनी गावाबाहेरून कोणीतरी महि‍ा आपल्याशी बोलायला, माहिती सांगायला येणार आहेत याचा फार आनंद झाल्याने आम्ही उत्सुकतेने हजर राहिलो अशा प्रतिक्रिया व्यक्त केल्या. श्रद्धा कळंबटे यांनी त्यांच्याशी सुसंवाद साधून देशात घडणाऱ्या चालू घडामोडी, महिलांवरील अत्याचार, रूढी-परंपरा व आधुनिकता, तरूण पिढीच्या समस्या, स्त्रीभृहणत्या इ. विविध विषयांवर महिलांना बोलतं केलं. प्रथमच कुणीतरी आपल्याला आपली मतं व्यक्त करायला संधी देतंय याचा अपूर्व आनंद त्यांच्या चेहऱ्यावरून ओसंडत वहात होता. त्यांना बोलतं केल्यानंतर कळंबटे यांनी २१ व्या शतकाला सामोरे जाताना त्यांच्या चुकीच्या कल्पना, गैरसमज, अंधश्रद्धा यावर मार्गदर्शन केलं. त्यांना शासनाच्या विविध योजनांची माहिती दिली. बचत गटातील महिलांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होण्यासाठी व्विध लघुउद्योजकांचीही माहिती दिली. प्रथमच अशा तऱ्हेचे बहुमुल्य मार्गदर्शन लाभल्याबद्दल सरपंच सुनिता सावंत यांनी समाधान व्यक्त करून पुन्हा एखादे शिबिर घेण्यास सुचविले. यावेळी मुलीच असणाऱ्या मातांना शुभेच्छापत्रे देवून सन्मानित करण्यात आले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सुनिता सावंत, प्रेरणा घडशी, मनोज खानविलकर, दीपाली सावंत यांनी विशेष प्रयत्न केले.